13 APR 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन विद्यापीठ कायदा कालसुसंगत

## माजी कुलगुरू डॉ. एस. आर. माळी : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा कालसुसंगत असून त्याच्या योग्य अंमलबजावणीवरच त्याची यशस्विता अवलंबून राहील, असे मत जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. आर. माळी यांनी आज येथे व्यक्त केले. नवीन अमलात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायद्याच्या संदर्भात सर्व संबंधित घटकांना सविस्तर माहिती करून देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या एकदिवसीय कार्यशाळेत बीजभाषण करताना ते बोलत होते.



डॉ. माळी म्हणाले, "शिक्षणाच्या दर्जावृद्धीवर नूतन कायद्यात भर दिला आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, शिक्षणपूरक कृतिसत्रे, आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा अंगीकार ही या कायद्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. दर्जावृद्धीसाठी नवसंशोधन व नवनिर्मितीस प्रोत्साहन, परीक्षा व मूल्यमापन पद्धतीत सुधारणा, आंतरविद्याशाखीय सहसंबंधात वृद्धी, इन्क्युबेशन, औद्योगिक साहचर्य तसेच कौशल्य विकासाधारित अभ्यासक्रमांना प्रोत्साहन आदी बाबी कायद्यात आहेत. त्यांची यथायोग्य अंमलबजावणी विद्यापीठांनी करणे गरजेचे आहे."

### उत्पन्नाचे स्रोत निर्माण करता येतील

**महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात म्हणाले, "विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर बंधने न आणता उलट कालसुसंगत तरतुदी केल्या आहेत. विद्यापीठांना परदेशात जाता येईल, क्लस्टर विद्यापीठे स्थापन करता येतील, आर्थिक अनियमितता टाळण्यासाठी त्यांचे इन्स्पेक्शन-ऑडिट करता येईल, विद्यापीठांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी स्वतःचे स्रोत निर्माण करता येतील, निवडणुका, नामांकने यांचा योग्य मेळ साधत अधिसभा, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद यांची फेररचना, बोर्ड ऑफ डीन्सचा समावेश अशा अनेक महत्त्वाच्या तरतुदी कायद्यात आहेत."**

शिक्षणतज्ज्ञ डॉ. आनंद मापुस्कर म्हणाले, "बदलत्या काळानुरूप कायदा बदलणे आवश्यक होते. त्या दृष्टीने या कायद्यात बोर्ड ऑफ इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राईजेस वगैरेंचा समावेश आहे. लोकसंख्येला कुशल मनुष्यबळामध्ये रूपांतरित करून तिची ऊर्जा सकारात्मक दिशेने वापरण्यासाठी कौशल्य शिक्षणाची तरतूद कायद्यात आहे. हा कायदा विद्यार्थिकेंद्री असला तरी त्याची कार्यवाही शिक्षककेंद्री आहे. सर्व अधिकार मंडळांवर प्राध्यापक असतात. गट-तट विसरून त्यांनी विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा कायदा राबविण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. विद्यापीठांनी सल्लागार मंडळ निर्माण करून त्यामध्ये मोठमोठे उद्योगपती, शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांना सामावून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यापीठांनी स्वतःच्या प्रगतीचा रोडमॅप तयार करावा."

दुपारच्या सत्रात शिक्षणतज्ज्ञ प्रा. सुधाकर मानकर, शंकरराव कुलकर्णी यांनी अनुक्रमे कायद्यातील शैक्षणिक तरतुदी व विद्यार्थीविषयक तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कार्यशाळा आयोजनामागील उद्दिष्टे सांगितली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

1 3 APR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य अंमलबजावणीवरच विद्यापीठ कायद्याचे यश अवलंबून

## माजी कुलगुरू माळी; शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा कालसुसंगत असून, त्याच्या योग्य अंमलबजावणीवरच त्याची यशस्विता अवलंबून राहील, असे मत जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. आर. माळी यांनी बुधवारी येथे व्यक्त केले.

१ मार्च २०१७ पासून अंमलात आलेल्या नवीन 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६'च्या संदर्भात सर्वसंबंधित घटकांना सविस्तर माहिती करून देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठातर्फे एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यशाळेत बीजभाषण करताना ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा झाली.

डॉ. माळी म्हणाले, शिक्षणाच्या दर्जावृद्धीवर नव्या कायद्यात भर देण्यात आलेला आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, शिक्षणपूरक कृतीसत्रे, आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा अंगीकार ही या कायद्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. दर्जावृद्धीसाठी नवसंशोधन व नवनिर्मितीस प्रोत्साहन, परीक्षा व मूल्यमापन पद्धतीत सुधारणा, आंतरविद्याशाखीय सहसंबंधात वृद्धी, इन्क्युबेशन, औद्योगिक सहचर्य, तसेच कौशल्य विकासाधारित अभ्यासक्रमांना प्रोत्साहन आदी बाबी या कायद्यात आहेत. त्यांची यथायोग्य अंमलबजावणी विद्यापीठांनी करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात म्हणाले, प्रगतीचा मार्ग हा उच्च शिक्षणातूनच जातो, हे लक्षात घेऊन नवीन कायद्यात पूर्वीच्या १९९४ च्या कायद्यापेक्षा साधारणतः ४० टक्के बदल करण्यात आला आहे. विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर बंधने न आणता उलट कालसुसंगत तरतुदी केल्या आहेत. विद्यापीठांना परदेशात जाता येईल, क्लस्टर विद्यापीठे स्थापन करता येतील, विद्यापीठांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी स्वतःचे वित्तीय स्रोत निर्माण करता येतील, अशा अनेक महत्त्वाच्या तरतुदी या कायद्यात केल्या आहेत.

शिक्षणतज्ज्ञ डॉ. आनंद मापुस्कर म्हणाले, बदलत्या काळानुरूप कायदा बदलणे आवश्यक होते. त्यादृष्टीने या कायद्यात बोर्ड ऑफ इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राईजेस वगैरेंचा समावेश केला आहे. लोकसंख्या ही आज आपली जमेची बाजू आहे. तिला कुशल मनुष्यबळामध्ये रूपांतरित करून तिची ऊर्जा सकारात्मक दिशेने वापरण्यासाठी कौशल्य शिक्षणाची तरतूद कायद्यात आहे. हा कायदा विद्यार्थीकेंद्री असला, तरी त्याची कार्यवाही शिक्षककेंद्री आहे. शिक्षण मंडळांपासून ते विद्या परिषदेपर्यंत सर्व अधिकार मंडळांवर प्राध्यापक असतात. आपापसातील गट-तट विसरून त्यांनी विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा कायदा राबविण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे.

विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कार्यशाळा आयोजनामागील उद्दिष्टे सांगितली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. दुपारच्या सत्रात शिक्षणतज्ज्ञ प्रा. सुधाकर मानकर, शंकरराव कुलकर्णी यांनी अनुक्रमे कायद्यातील शैक्षणिक तरतुदी व विद्यार्थीविषयक तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेस संस्थाचालक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2017
पुढारी

# प्राचार्य कणबरकर पुरस्काराचे आज वितरण

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार गुरुवारी (दि. १३) रयत शिक्षण संस्थेला प्रदान करण्यात येणार आहे. सकाळी अकरा वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत.

13 APR 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले यांना अभिवादन

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

शहरातील विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालयांत महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. इतिहास अधिविभागात हा कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. नंदा पारेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, उमेश भोसले, अविनाश भाले, डॉ. निलिशा देसाई आदी उपस्थित होते.

**बालकल्याण संकुल**

संस्थेच्या मानद कार्यवाह पद्मजा तिवले यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अधीक्षक कांचन हेबाळकर, पी. के. डवरी, नजिरा नदाफ, सचिन माने, द्रौपदी पाटील, संध्या तळेकर, टी. एम. कदम, स्मिता वायचळ, अश्विनी आवळे आदींची उपस्थिती होती.

**रिपाइं कार्यालय**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाच्या विभागीय कार्यालयात महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रिपाइं (ए) चे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रा. शहाजी कांबळे महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांसाठी मांडलेला आराखडा अंमलात आणण्याची मागणी केली. यावेळी सुखदेव बुध्याळकर, संजय जिरगे, दिलीप कोथळीकर, बाजीराव जैताळकर, अविनाश अंबपकर, जयवंत ढाले, गुलाब शिर्के आदींची उपस्थिती होती.

**शेतकरी कामगार पक्ष**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात महात्मा जोतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाई के. डी. पाटील, मोहन पाटील, सुशांत जाधव, बाबुराव कदम, दत्तात्रय पाटील, अंबाजी पाटील, साताप्पा पाटील, धैर्यशील पाटील, जनार्दन पाटील, एकनाथ पाटील, आनंदराव मोरे, अरविंद मगदूम आदी उपस्थित होते.

**मराठा महासंघ, परिवर्तन संघटना, मल्हार सेना, सिटिझन फोरम**

बिंदू चौक येथील महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड. धनंजय पठाडे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंत मुळीक, मल्हार सेनेचे बबन रानगे, अमोल कुरणे, प्रसाद जाधव, राजन पिडाळकर, ॲड. पंडितराव सडोलीकर, बाळासाहेब भोसले आदींची उपस्थिती होती.

**मिस क्लार्क होस्टेल**

मिस क्लार्क होस्टेल व ब्लू बर्ड इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा जोतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकर निर्वाणी होते. याप्रसंगी शाळेच्या उपाध्यक्षा सुजाता माने, सुधाकर विणकरे, उदय कुबडे शाळेतील कर्मचारी, पालक यांची उपस्थिती होती..